आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०० वाजता
२४ मे २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- प्रत्येक राज्यानं, सर्व पायाभूत सुविधा असणारं ‘किमान एक पर्यटन स्थळ’ विकसित करावं असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आवाहन

- दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी आणखी तीन शिष्टमंडळं परदेशी रवाना

- जम्मू काश्मीरमध्ये शहीद झालेले अहिल्यानगरचे सुपुत्र ‘जवान संदीप गायकर’ यांच्या पार्थिवावर लष्करी इतमामात अंत्यसंस्कार

- नैऋत्य मौसमी पाऊस वेळेआधीच आठ दिवस केरळमध्ये दाखल

**आणि**

- इंग्लड दौऱ्यासाठी भारताचा कसोटी क्रिकेट संघ जाहीर, शुभमन गीलकडे कर्णधारपदाची धुरा

**<><><><>**

प्रत्येक राज्यानं सर्व पायाभूत सुविधा असणारं आणि जागतिक मानकं पूर्ण करणारं ‘किमान एक पर्यटन स्थळ’ विकसित करावं, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज राज्यांना सांगितलं. नवी दिल्ली इथं निती आयोगाच्या १०व्या प्रशासकीय परिषदेच्या बैठकीचं अध्यक्षपद प्रधानमंत्री नरेंद्र मोदी भूषवलं, त्यावेळी ते बोलत होते. 'विकसित भारतासाठी विकसित राज्यं २०४७' अशी या वर्षीच्या बैठकीची संकल्पना आहे. भारताचं झपाट्यानं नागरीकरण होत असून, शहरांच्या प्रगतीसाठीसाठी नवोन्मेष, विकास आणि शाश्वतता आवश्यक आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. विकासाचा वेग वाढवणं अत्यावश्यक असून राज्य सरकार आणि केंद्र सरकारने एकत्रितपणे काम केलं तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही, सर्व राज्यं विकसित झाली तर विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य होईल, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

विकसित भारताचं उद्दीष्ट साध्य करण्यासाठी महाराष्ट्र सज्ज आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. महाराष्ट्रात २०३० पर्यंत राज्यासाठी आवश्यक ५२ टक्के ऊर्जा ही हरित स्रोतांतून निर्माण केली जाईल अशी ग्वाही देखील त्यांनी यावेळी दिली.

या बैठकीला राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्यमंत्री, लेफ्टनंट गव्हर्नर, केंद्रीय मंत्री आणि नीती आयोगाचे उपाध्यक्ष, सदस्य आणि मुख्य कार्यकारी अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

**<><><><>**

नीती आयोगाच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या बैठकीत ३६ पैकी ३१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी भाग घेतल्याचं नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी व्ही आर सुब्रह्मण्यम यांनी वार्ताहरांना सांगितलं. नीती आयोगाच्या गव्हर्निंग कौन्सिलचा हा आतापर्यंतचा सर्वाधिक सहभाग आहे, असं सुब्रह्मण्यम म्हणाले.

**<><><><>**

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी सात बहुपक्षीय प्रतिनिधीमंडळं वेगवेगळ्या देशांना भेटी देत आहेत. याअंतर्गत भाजपाचे खासदार बैजयंत पांडा, काँग्रेस खासदार शशी थरुर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालील आणखी तीन सर्वपक्षीय शिष्टमंडळं आज पहाटे परदेशी रवाना झाली.

द्रमुकच्या खासदार कनिमोळी यांच्या नेतृत्वातल्या प्रतिनिधीमंडळानं आज रशियात मॉस्को इथल्या भारतीय दूतावासात संयुक्त पत्रकार परिषदेत दहशतवादाविरोधातलं भारताचं शून्य सहिष्णता धोरण स्पष्ट केलं. पहलगाम इथल्या दहशतवादी हल्ल्याविरोधातल्या भारताच्या संयमित कारवाईची माहितीही त्यांनी दिली.

संयुक्त जनता दलाचे खासदार संजय झा यांच्या नेतृत्वाखालच्या प्रतिनिधीमंडळानं आज जपानमधल्या दूतावासात तिथल्या भारतीय समुदायाशी संवाद साधून पहलगाम दहशतवादी हल्ल्यातली पाकिस्तानची भूमिका उघड केली. यानंतर हे प्रतिनिधीमंडळ दक्षिण कोरियाला रवाना झालं.

भाजपाचे खासदार बैजयंत पांडा यांच्या नेतृत्वाखालचं सर्वपक्षीय प्रतिनिधीमंडळ आज बहरीनला पोहचलं. तिथे ते दहशतवादाविरोधातली भारताची भूमिका मांडतील. या प्रतिनिधीमंडळात एमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवेसी, काश्मीरचे माजी मुख्यमंत्री गुलाम नबी आझाद यांच्यासह इतर प्रतिनिधींचाही समावेश आहे.

**<><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशात आणि राज्यात विविध ठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत.

राज्यात **धाराशिव** जिल्ह्यात तिरंगा रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये महिला, विद्यार्थी, वारकरी, माजी सैनिक, आणि नागरिक मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

**सोलापुरात** देखील तिरंगा रॅली काढण्यात आली. या रॅलीत महिला आणि विद्यार्थ्यांसह अनेक नागरिक सहभागी झाले.

यावेळी रॅलीत सहभागी झालेले आमदार देवेंद्र कोठे म्हणाले…

**होल्ड.... बाईट**

**अहिल्यानगर** मध्ये कोपरगावकरांच्या वतीनं भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. अमर जवान स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करून या रॅलीची सुरवात झाली.

**कोल्हापूरात** देखील छत्रपती शाहू महाराज समाधी स्थळापासून तिरंगा रॅली काढण्यात आली. यावेळी खासदार शाहू छत्रपती देखील रॅलीत सहभागी झाले होते.

**बीड** शहरात राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या उपस्थितीत तिरंगा रॅली काढण्यात आली.

**<><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या अकोले तालुक्यातले शहीद जवान संदीप गायकर यांच्या पार्थिवावर आज ब्राह्मणवाडा इथं लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. गुरुवारी पहाटे जम्मू-काश्मीरमधील किश्तवाड सेक्टरमध्ये सीमेवर दहशतवाद्यांविरोधात लढताना त्यांना वीरमरण आलं. या वीर जवानाला शेवटची मानवंदना देण्यासाठी प्रचंड गर्दी झाली होती.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासीयांशी संवाद साधतील. हा या कार्यक्रमाचा १२२ वा भाग असेल. या कार्यक्रमाचं आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व प्रसारण सेवा, युट्यूब वाहिन्या, संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एअर या मोबाईल ॲपवरून थेट प्रसारण होईल. आकाशवाणीवर मूळ प्रसारणानंतर लगेचच या कार्यक्रमाच्या प्रादेशिक भाषेतल्या अनुवादाचं प्रसारण होईल.

**<><><>**

नैऋत्य मोसमी पाऊस आज वेळेच्या आठ दिवस आधीच केरळमध्ये दाखल झाला. २००९ नंतर पहिल्यांदाच मान्सून एवढ्या लवकर सक्रिय  झाल्याचं  भारतीय हवामान विभागानं म्हटलं आहे.

या पार्श्वभूमीवर केरळ, दक्षिण कोकण, कर्नाटकचा किनारपट्टी आणि घाटमाथा, मध्य महाराष्ट्र, गोवा आणि पश्चिम राजस्थानात रेड ॲलर्ट जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्र, तामिळनाडू, कर्नाटक, गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, बिहार आणि आसाममध्ये ऑरेंज ॲलर्ट देण्यात आला आहे.

नैऋत्य मोसमी पावसासह अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळं राज्यात आज मराठवाड्यासह, विदर्भ-कोकणात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. याविषयी मुंबईतल्या प्रादेशिक हवामान विभागाच्या प्रमुख शुभांगी भुते यांनी आकाशवाणीला अधिक माहिती दिली.

**बाईट - शुभांगी भुते**

**<><><>**

बी सी सी आय अर्थात भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं आगामी इंग्लंड दौऱ्यासाठी १८ सदस्यीय कसोटी क्रिकेट संघ आज जाहीर केला. संघाचं कर्णधारपद शुभमन गिलकडे देण्यात आलं असून यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंतकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. याशिवाय कसोटी संघात यशस्वी जयस्वाल, के एल राहुल, साई सुदर्शन, अभिमन्यू ईस्वरन, करूण नायर, नितीश कुमार रेड्डी, रवींद्र जडेजा, ध्रुव जुरेल,

वॉशिंग्टन सुंदर, शार्दूल ठाकूर, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, प्रसिध कृष्णा, आकाश दीप, अर्षदीप सिंग आणि कुलदीप यादव यांचा समावेश आहे.

**<><><>**

क्वालालंपूर इथं सुरु असलेल्या मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरीत भारताच्या किदम्बी श्रीकांतनं आज अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्यानं उपांत्य फेरीत जपानच्या युशी तनाका याचा २१-१८, २४-२२ असा पराभव केला. या विजयाने श्रीकांत यावर्षी बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश करणारा पहिला भारतीय बॅडमिंटनपटू ठरला आहे. अंतिम फेरीत श्रीकांतचा सामना उद्या चीनच्या ली शि फेंग याच्याशी होणार आहे.

**<><><>**

हिंदी चित्रपटातले अभिनेते  मुकुल देव यांचं काल रात्री मुंबई इथं निधन झालं. ते ५४ वर्षांचे होते. मुकुल यांचे भाऊ अभिनेते राहुल देव यांनी समाजमाध्यमाद्वारे मुकुल यांच्या निधनाची माहिती दिली. दिग्दर्शक हंसल मेहता, अभिनेता सुनील शेट्टी, नील नितीन मुकेश, अभिनेत्री सुष्मिता सेन, कंगना रनौत यांनी मुकुल देव यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. दिल्ली इथं उद्या मुकुल देव यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होणार आहेत.

सन ऑफ सरदार, आर राजकुमार, जय हो या चित्रपटातल्या मुकुल यांच्या भूमिका गाजल्या होत्या.

**//<><><><>//**